पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक :नस/५/कावि/९५५/२०२२
दिनांक – ९/२/२०२२

प्रति,
मा. ...................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

**विषय** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा **दिनांक १८/२/२०२२** रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **फेब्रूवारी-२०२२** ची मासिक मा.महापालिका सभा **शुक्रवार** दिनांक **१८/२/२०२२** रोजी दुपारी **२.००** वाजता मा. अवर सचिव महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजीत करणेत आलेली आहे. मा.महापौर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरुन ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित करणार आहेत. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. आपण संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे सभागृहातून अथवा मोबाईल ऍपद्वारे ऑनलाईन पध्दतीने सभेत सहभागी व्हावे ही विनंती.

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

**सूचना**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक-६७**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **फेब्रूवारी-२०२२** ची मासिक मा.महापालिका सभा **शुक्रवार** दिनांक **१८/२/२०२२** रोजी दुपारी २.०० वाजता मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजीत करणेत आलेली आहे. मा.महापौर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरुन ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित करणार आहेत. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

------

अ) मा.महापालिका सभा क्रमांक -६३ दि.२०/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणे.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक -६४ दि.१५/११/२०२१ व दि.१८/११/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणे.

क) मा.महापालिका सभा क्रमांक -६५ दि.१६/१२/२०२१ व दि.२४/१२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणे.

**ड)** मा.महापालिका सभा क्रमांक -६६ दि.२०/१/२०२२ चा सभावृत्तांत कायम करणे.

-------

**नियुक्त्या**

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे.

------

**प्रश्नोत्तरे**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

-----

## मा.स्थायी समितीचे ठराव

**विषय क्रमांक २)** संदर्भ-१) मा.मनपा आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पवै/०४/कावि/४३/२०२१ दि.०३/१२/२०२१
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०८५३ दि.१५/१२/२०२१
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७६३ दि.२०/१/२०२२

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे जिल्हा परिषद यांचेकडील पत्र क्र. जावक क्र.२२१७-२०/२०२१ दि.०२/०९/२०२१ अन्वये सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध, पुणेच्या बांधकामा साठी र.रु.२ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस विनंती केली आहे. सदर पत्राचे अवलोकन केले असता पाळीव प्राण्यांना आवश्यक सोय सुविधांचे आधुनिकीकरण व स्पेशलाईज सेवा उपल्बध करुन सेवा नियमीत व प्रभावी होण्यासाठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीसाठी एक सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल, औंध येथे नियोजीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये पाळीव प्राणी (लहान व मोठे) यांची संख्या जास्त असुन दिवसेंदिवस पाळीव प्राणी पाळणेची अभिरुची वाढत आहे. त्यामुळे संख्ये मध्ये भर पडत आहे. तसेच शहराची पार्श्वभूमी पाहता ग्रामीण भागाचे एकत्रीकरण होऊन शहराची निर्मिती झाल्याने मोठी जनावरे पाळण्याचे प्रमाण देखील लक्षणीय आहे. या सर्व पशुधनावर वेळेवर उच्च दर्जाच्या तज्ञांकडुन रोग निदान व उपचार/ शैल्यचिक्तिसा होणे आवश्यक आहे. सदरचे सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल, औंध या सर्व सुविधा उपल्ब्ध करुन देण्यास व संदर्भीय रुग्णालय पशुंसाठी जीवनदायी ठरणार आहे. सदरचे हॉस्पिटल मार्फत खालील सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे.

1. पिंपरी चिंचवड हद्दीसाठी २४*७ रुग्णवाहिका उपलब्ध करुन देणे.
2. आय.पी.डी सुविधा (अंतर रुग्णविभाग)
3. सर्व प्रकारचे शल्यचिकित्सा.
4. तज्ञ मार्गदर्शक मार्फत पशु पालकास मार्गदर्शन व सल्ला.
5. सर्व प्रकारच्या रोग निदान व उपचार सेवा माफक दरा मध्ये उपलब्ध करुन देणे.

येणे प्रमाणे नियोजीत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा फायदा पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांना त्यांचे पशुधनास तत्पर तज्ञतेची पशु रोग निदान आणि उपचार मार्गदर्शन सल्ला देणे या बाबतचे सेवा शासकीय पशुवैद्यकांद्वारे मापक शासकीय दराने उपल्बध होणार असल्याने, या लोकहितार्थ कारणासाठी उक्त हॉस्पिटलच्या इमारतीच्या बांधकामासाठी र.रु.२ कोटी मागणी केलेली आहे. सदर प्रकल्पाची उपयुक्तता व लोकहित याचा सकारात्मक विचार करुन सदर प्रकल्पास मागणी केले प्रमाणे नियोजित प्रकल्पाच्या मंजुरीस अधिन राहुन नव्याने शिर्षक तयार करुन त्या लेखाशिर्षकावरील तरतुदीमधून खर्ची टाकणे देणे योग्य राहील. सद्यस्थितीत पशुवैद्यकीय विभागात र.रु.२ कोटी कोणत्याही लेखाशिर्षकावर उपलब्ध नाही. तरी याकामी विभागातील उपलब्ध लेखाशिर्षक चिखली येथील कोंडवाडा चालविण्याचा खर्च यावरुन र.रु.५० लाख इतकी रकम नव्याने मागणी केलेल्या सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध, पुणेच्या बांधकामासाठी

र.रु.२ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत. या नविन लेखाशिर्षकावर वर्ग करणे योग्य राहिल. उर्वरित र.रु.१.५० कोटी इतकी रकम बांधकामाच्या प्रमाणात सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाच्या तरतुदींतुन देणे योग्य राहील.उपरोक्त प्रस्तावास अनुसरुण खालील नमुद मुद्ये मा.स्थायी समिती सभे मार्फत मा. महापालिका सभेकडे मंजुरी कामी पाठविणे योग्य राहील.

१. सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध, पुणेच्या बांधकामासाठी र.रु.२ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत हे नविन लेखाशिर्षक तयार करणे.

२. चिखली येथील कोंडवाडा चालविण्याचा खर्च या लेखाशिर्षकावरुन र.रु.५० लाख नविन लेखाशिर्षकावर वर्ग करणे.

३. सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध, पुणेच्या बांधकामासाठी र.रु.२ कोटी निधी मा.उप आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे यांच्या नावे अदा करणेकामी मान्यता देणेस तसेच सुपर स्पेशालिटी व्हेटेरिनरी हॉस्पिटल औंध या ठिकाणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा प्रतिनिधी म्हणून एक डॉक्टर व एक प्रतिनिधी ठेवणेस तसेच भोसरी या ठिकाणी पाळीव प्राणी, जनावरे यांचेसाठी अद्यावत पशुवैद्यकीय दवाखाना उभारण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**(टिप- माहे फेब्रूवारी २०२२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

**------**

## <u>मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे/कामे</u>

**विषय क्रमांक ३)** संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अमुका/३/कावि/१७३/ २०२१दि. ५/१०/२०२१
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७२१ दि.२०/१०/२०२१ अन्वये.
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३५ दि.१८/११/२०२१ अन्वये.
४) मा.महापालिका सभा ठराव क्र.७४८ दि.२४/१२/२०२१ अन्वये.
५) मा.महापालिका सभा ठराव क्र.७७१ दि.२०/१/२०२२ अन्वये.

मा.महापालिका सभा ठराव क्र. ६९६ दि.२०/०९/२०२१ अन्वये यांत्रिकीकरणाद्वारे साफसफाईचा विषय प्रशासकीय मान्यतेकामी माहे ऑक्टोबर महिन्याचे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच जुन्या आरएफपी मधील ४ पॅकेज ऐवजी २ पॅकेजमध्ये शहरातील रस्त्यांची विभागणी करुन सुधारित आरएफपी मसुदा तयार करण्यास व खर्चामध्ये कपात करुन यंत्रे आणि मनुष्यबळाची फेररचना करण्यात यावी असेही ठरावामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

त्यानुसार आरएफपी मसुद्यामध्ये बदल करुन सुधारित आरएफपी तयार करण्यात आलेला असून आरएफपी मध्ये असलेली रचना व खर्च यामध्ये बदल झालेला आहे. नविन आरएफपी मसुद्यामध्ये असलेल्या करण्यात आलेला बदलांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

सदर कामकाजाकरिता नियुक्त सल्लागार संस्था मे.टंडन अर्बनन सोल्युशन्स प्रा.लि. यांचेमार्फत सुधारित आरएफपी मसुदा तयार करण्यात आलेला असून त्यानुसार शहरातील १८.०० मी. पेक्षा मोठ्या रस्त्यांची २ भागांमध्ये विभागणी करण्यात आलेली असून त्यामध्ये Southern side of head office व Northern side of head office चे प्रत्येकी १ पॅकेज अशा रितीने २ पॅकेज निश्चित करण्यात आलेले आहे.

पॅकेज क्र. १ करिता ३३१ किमी व पॅकेज क्र. २ करिता ३३९.१५ किमी, इतकी रस्त्याची लांबी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरातील एकत्रित रस्त्यांची अंदाजित लांबी (Sweeping Length)६७०.१५ गृहीत धरण्यात आलेली आहे. यामध्ये शहरातील महामार्ग, बीआरटी मार्ग व १८.०० मी. पेक्षा रस्त्यांची लांबी गृहीत धरण्यात आलेली आहे. यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या वाहनांची व मनुष्यबळा बाबतची माहिती आरएफपी मध्ये समाविष्ट करण्यात आलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

**Package 1: - Southern side of Head Office**

| Heavy Vehicle (5-6 M3) | Medium Vehicle (2.5-3.5 M3) | Gobbler / Litter Picker | Total Vehicles | Hook loader / Compactor | Water Tanker (10000 L) |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4 | 8 | 16 | 3 | 2 |

**Proposed Manpower Deployment**

| Sweeper | Driver | Operator | Helper | Total |
|---|---|---|---|---|
| 150 | 16 | 20 | 5 | 191 |

**Package 2: - Northern side of Head Office**

| Heavy Vehicle (5-6 M3) | Medium Vehicle (2.5-3.5 M3) | Gobbler / Litter Picker | Total Vehicles | Hook loader / Compactor | Water Tanker (10000 L) |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4 | 8 | 16 | 3 | 2 |

**Proposed Manpower Deployment**

| Sweeper | Driver | Operator | Helper | Total |
|---|---|---|---|---|
| 150 | 16 | 20 | 5 | 191 |

सदर निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असून त्याकरिता अंदाजे र.रु.३६२.०४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तथापि, निविदा प्रक्रिया राबविण्या करिता खालील बाबींची पूर्तता करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

1. निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार असे दायित्व पत्करण्यापूर्वी मा.महापालिका सभेची मंजूरी घेण्याचे प्रावधान आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता अधिनियमातील कलम

७२(ब) नुसार मा.महापालिका सभेची अंदाजित र.रु. ३६२.०४ कोटी अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

2. मा.महापालिका सभेमार्फत प्रशासकीय मान्यता घेण्यात आल्यानंतर आरएफपी मसुद्यामध्ये निविदा प्रक्रियेपूर्वी अथवा निविदा प्रक्रिये दरम्यान काही बदल करणे आवश्यक असल्यास उदा.मनुष्यबळ, वाहनसंख्या, अंदाजित / प्रत्यक्ष खर्च इ. सदर बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील.
3. निविदा प्रक्रियेअंती निश्चित होणा-या दरास व संविदेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

सबब, शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळया जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजा करिता तयार करण्यात आलेल्या निविदा / आरएफपी नुसार ७ वर्षे कालावधीकरिता निविदा प्रक्रिया राबविणेकामी व त्यापोटी होणा-या अंदाजे र.रु.३६२.०४ कोटींच्या अथवा प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यतेकामी प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (ब) नुसार मा.महापालिका सभेची मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(टिप- माहे फेब्रूवारी २०२२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

------

## <u>समित्यांचे अहवाल</u>

### <u>मा.विधी समिती</u>

**विषय क्रमांक ४)** अ) कार्यपत्रिका क्र.४ दि. ७/१/२०२२ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

### <u>मा.महीला व बालकल्याण समिती</u>

**विषय क्रमांक ५)** अ) कार्यपत्रिका क्र.४ दि.२३/१२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) कार्यपत्रिका क्र.५ दि.१३/१/२०२२ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

### <u>मा.शहर सुधारणा समिती</u>

**विषय क्रमांक ६)** अ) कार्यपत्रिका क्र.४ दि.४/१/२०२२ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

### <u>मा.क्रिडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती</u>

**विषय क्रमांक ७)** अ) कार्यपत्रिका क्र.३ दि.१०/१२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

### <u>मा.शिक्षण समिती</u>

**विषय क्रमांक ८)** अ) कार्यपत्रिका क्र.४ दि.६/१/२०२२ व दि.१०/१/२०२२ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

## <u>ब प्रभाग समितीचे ठराव</u>

**विषय क्रमांक ९) संदर्भ –** १) मा.ब प्रभाग समितीकडील ठ.क्र.५ दि.११/१/२०२२
२) मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) ब प्रभाग
यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/२/३/२०२२ दि.२७/१/२०२२

मा. राजेंद्र गावडे यांचे दि.२८/१२/२०२१ चे पत्रानुसार चिंचवड गावातील उद्योजक कै.दिलीप चिलेकर यांचे गेल्या वर्षी आकस्मीत निधन झाले. कै.दिलीप चिलेकर यांनी त्यांच्या हयाती मध्ये विविध सामाजिक कार्य केलेले आहे. गरजु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत तसेच राहण्याची व्यवस्था संताजी महाराज जगनाडे यांच्या पालखीसाठी चांदीचा रथ करुन दिला. वधुवर मेळावे, गरजुंना नोकरी मिळण्यासाठी मदत, विविध सामाजिक कार्य करणा-या संस्थांना मदत अशी विविध कामे त्यांनी केली होती. कै.दिलीप चिलेकर यांच्या कार्याच्या स्मृती या कायम राहण्यासाठी चिंचवड गावातील उड्डाणपुला खालील पी एन गाडगीळ या दुकानासमोरील आतील कॉलनी मधील रस्त्याला (सिल्वर गार्डन कॉलनी) वैकुंठवाशी दिलीप चिलेकर पथ असे नाव देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १०) संदर्भ –** १) मा.ब प्रभाग समितीकडील ठ.क्र.६ दि.११/१/२०२२
२) मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) ब प्रभाग
यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/२/३/२०२२ दि.२७/१/२०२२

मा. सुरेश भोईर यांचे दि.०३/०१/२०२२ चे पत्रानुसार माणिक कॉलनीमधील सर्व्हे नं.२७८ येथील जागा ही भोईर परिवाराची होती. सदर जागेत महानगरपालिकेचे उद्यान असुन महापालिकेने जागा ताब्यात घेतली आहे. सदर जागेत उद्यान असुन तेथील उद्यानाला स्व.बाळासाहेब दिनकर भोईर उद्यान असे नामकरण करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

------

## <u>ड प्रभाग समितीचे ठराव</u>

**विषय क्रमांक ११) संदर्भ –** १) मा.ड प्रभाग समितीकडील ठ.क्र. ३१ दि.७/१/२०२२
२) मा.सचिव तथा लेखाधिकारी ड प्रभाग यांचेकडील पत्र
क्र.डक्षेका/सभा/कावि/५/२०२२ दि.१९/१/२०२२

प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर (मौजे रहाटणी येथील प्राधिकरणाच्या पेठ क्र.३८ औंध रावेत रस्त्यालगत) विरंगुळा केंद्र / अभ्यासिकासाठी फर्निचर व इतर स्थापत्य विषयक कामे करणे या कामातुन सदर ठिकाणी विरंगुळा केंद्र / अभ्यासिका केंद्राचे काम करणेत आलेले आहे. राष्ट्रमाता

राजमाता जिजाऊ त्यांच्या सद्गुण, शौर्य आणि दूरदृष्टीसाठी ओळखल्या जात होत्या. हे सर्व गुण त्यांनी शिवरायांना दिले. त्यानी शिवरायांना स्वराज्याची शिकवण दिली आणि एक महान योध्दा म्हणुन उभे केले. त्यामुळे सदर अभ्यासिकेस राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांचे नांव देणे तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. पिंपळे सौदागर येथील गार्डनसाठी यापुर्वी राजमाता जिजाऊ उदयान नांव देण्यात आले आहे. त्या शर्तीवर अभ्यासिकेसाठी सदरचे नाव देण्यासाठी मा.श्री. नाना काटे यांची सुध्दा अनुमती आहे. तरी प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर (मौजे रहाटणी येथील प्राधिकरणाच्या पेठ क्र.३८ औंध रावेत रस्त्यालगत) विरंगुळा केंद्र/ अभ्यासिका केंद्रास "राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ अभ्यासिका" असे नामकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक १२)** संदर्भ- १) मा.ड प्रभाग समितीकडील ठ.क्र. ३२ दि.७/१/२०२२
२) मा.सचिव तथा लेखाधिकारी ड प्रभाग यांचेकडील पत्र
क्र.डक्षेका/सभा/कावि/५/२०२२ दि.१९/१/२०२२

पिंपळे सौदागर येथील आरक्षण क्रमांक ३६२ हे खेळासाठी आरक्षित मैदान आहे. सदर ठिकाणाचे स्थापत्य विषयक कामे बहुतांश पुर्ण करण्यात आलेली आहेत. सदर खेळाच्या मैदानास तरुण, अबाल वृध्द या सर्वाना प्रेरणादायी ठरेल असे नामकरण करणे आवश्यक आहे. तथापि सदर खेळाच्या मैदानास सर्वाना प्रेरणादायी ठरेल असे "**शिवछत्रपती क्रीडा संकुल**" असे नामकरण करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

------

**<u>ह प्रभाग समितीचे ठराव</u>**

**विषय क्रमांक १३)** संदर्भ- १) मा. ह प्रभाग समितीकडील ठ.क्र. ७ दि.६/१/२०२२
२) मा.सचिव तथा क्षेत्रीय अधिकारी ह प्रभाग यांचेकडील पत्र क्र.
हक्षेका/कावि/०३/२०२२ दि.६/१/२०२२

प्रभाग क्र.३०, दापोडीमधील जयभिमनगर परिसरात दुमजली नविन सांस्कृतिक भवन व व्यायाम शाळा आधुनिक पध्दतीने विकसीत करण्यात आली असुन सदरील इमारतीमधील सांस्कृतिक भवनास "विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर" व व्यायाम शाळेस "कालकथित सागर गौतम बोरडे (नॅशनल कॅरम खेळाडू)" असे नामकरण करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १४)** संदर्भ- १) मा. ह प्रभाग समितीकडील ठ.क्र. ८ दि.६/१/२०२२
२) मा.सचिव तथा क्षेत्रीय अधिकारी ह प्रभाग यांचेकडील पत्र क्र. हक्षेका/कावि/०८/२०२२ दि.२८/१/२०२२

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र. ३० दापोडी सीएमई गेट समोरील ग्रेडसेपरेटरला अद्याप नाव देणेत आलेले नाही. तरी नुकत्याच हेलिकॅप्टर दुर्घटनेत शहिद झालेले चिफ ऑफ डिफेन्स जनरल बिपिन रावत यांचे नांव देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक १५)** संदर्भ- १) मा. ह प्रभाग समितीकडील ठ.क्र. ९ दि.६/१/२०२२
२) मा.सचिव तथा क्षेत्रीय अधिकारी ह प्रभाग यांचेकडील पत्र क्र. हक्षेका/कावि/०८/२०२२ दि.२८/१/२०२२

प्रभाग क्रमांक २० मध्ये संत तुकाराम महाराज पुतळयाजवळील चौकास छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण करण्यास तसेच अमरज्योत मित्रमंडळ जवळील चौकास स्वर्गीय प्रचिकेत काळे चौक असे नामकरण करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

आपला विश्वासू,

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/५/कावि/९५५/२०२२
दिनांक : ९/२/२०२२

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.